# -: अविश्वास ठराव मार्गदर्शक सूचना :-

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 35 नुसार अविश्वास ठराव प्रस्ताव सादर केला जातो.

1) ग्रामपंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणा-या सदस्यांच्या एकूण संस्थेच्या एक तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी तहसिलदार यांना सरपंच/उपसरपंच यांचेबाबत नोटीस देऊन सरपंच किंवा उपसरपंच यांच्याविरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव मांडता येईल. तसेच अशी नोटीस तहसिलदारांना एकदा दिल्यानंतर पुन्हा मागे घेता येणार नाही.

2) नोटीसबरोबर सदर 9 प्रती तहसिलदारांना देणेत याव्यात.

3) तहसिलदार यांना नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आंत, तहसिलदार अविश्वास प्रस्तावावर विचार करण्यासाठी, स्वत:च्या अध्यक्षतेखाली ते नेमून देतील अशा वेळी, पंचायतीच्या कार्यालयात पंचायतीची विशेष सभा बोलावतील.

4) ग्रामपंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणा-या सदस्यांच्या एकूण संख्येच्या दोन तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या बहुमताने असा प्रस्ताव संमत होणे आवश्यक आहे.

5) जेथे महिला सरपंच/उपसरपंच असल्यास, त्यांचे विरुध्द दाखल केलेला अविश्वास ठराव संमत होण्यासाठी पंचायतीच्या एकूण सदस्य संख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने इतक्या असा प्रस्ताव संमत होणे आवश्यक आहे.

6) अशाप्रकारे अविश्वास ठराव प्रस्ताव संमत झाल्यास, संबंधित सरपंच किंवा उपसरपंच त्याची कार्ये कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील.

7) परंतु सदरचा निर्णय सरपंच/उपसरपंच यांचे बाजूने झाला असेल तर, त्याव्दारे असा प्रस्ताव रद्द होईल.

8) **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम** 1958 **कलम** 35 कलम (3-अ) नुसार जर असा प्रस्ताव, पंचायतीच्या कोणत्याही सभेत बहुमताने संमत करण्यात आला असेल तर, अशा विशेष सभेच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, यथास्थिती, सरपंच किंवा उपसरपंच यांच्याविरुध्द असा कोणताही नवीन प्रस्ताव आणता येणार नाही.

9) **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम** 1958 **कलम** 35 **कलम** (3-**ब**) **पोटकलम** (3) नुसार संमत करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या विधिग्राहयतेसंबंधी विवाद उपस्थित करण्याची यथास्थिती, सरपंचाची किंवा उप-सरपंचाची इच्छा असेल, तर तो असा प्रस्ताव ज्या दिनांकास संमत करण्यात आला असेल त्या दिनांकापासून सात दिवसांच्या आंत, असा विवाद जिल्हाधिका-याकडे पाठवील.